ISSN (Online) 2582-9327

IJARSCMT

International Journal of Advanced Research in Science, Commerce, Management and Technology

Impact Factor: 5.781

Volume 4, Issue 1, January 2023

# राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, अंमलबजावणी आणि आव्हाने

**प्रा. डॉ. मुरलीधर पंडीत गायकवाड**

सहयोगी प्राध्यापक व व्यवसायिक, अर्थशास्त्र प्रमुख

वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, मुरूड जंजिरा, रायगड

**प्रास्ताविकः—**

शिक्षण हे सामाजिक बदलाचे महत्वपूर्ण माध्यम आहे. राष्ट्रीय दृष्टीकोनातून सर्वांसाठी शिक्षण हा राष्ट्र विकासाच्या संदर्भातला महत्वाचा भाग आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा प्रमुख मार्ग आहे. विविध स्तरावर मानव विकासाचे कार्य करण्याची सर्वात मोठी शक्ती शिक्षणात आहे. त्यादृष्टीने आपल्या देशात विविध कालखंडात शिक्षण व शिक्षण पध्दतीत सुधारणा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले. उच्च शिक्षणाच्या विस्ताराची धोरणे आणि विकासासाठी प्रचलित कायद्याच्या चौकटीत आराखडा तयार करावा लागतो. शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाचे प्रतिबिंब पडणे आवश्यक असते. गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टिने दुसऱ्या क्रांतीची आवश्यकता जाणवायला लागली. बहुतेक काम हे शारिरीक श्रमापेक्षा जास्त श्रेष्ठ असे साधारणतः मानण्यात येऊ लागल्याने अर्थव्यवस्थेला आवश्यक असलेले अर्धकुशल कामगार मिळणे दुरापास्त झाले. नव्या शैक्षणिक धोरणाने सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील समस्या ओळखल्या, आपण कुठे आहोत याची जाण प्रामाणिकपणे या धोरणाने करून दिली. परंतु या प्रामाणिक धोरणांची, प्रामाणिक अंमलबजावणी देखील तितकीच महत्वाची आहे. शैक्षणिक व्यवस्थेची दुरूस्ती मोठया प्रमाणावर करण्याची गरज या शैक्षणिक धोरणाने दर्शवली असून, अत्यंत गांभीर्याने परिस्थितीचे अवलोकन केल्याचे जाणवते. संख्यात्मकतेपासून गुणवत्तापूर्ण दृष्टीकोन असा प्रवास शैक्षणिक क्षेत्राचा होणे या धोरणाच्या संदर्भात अपेक्षित आहे.

**नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020:**

शिक्षण हे अत्यंत महत्वाचे आहे जगात आणि भारतातही अशी अनेक संशोधने झाली आहेत. शिक्षण हे जलद आणि सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन असल्याचे सिध्द करते. शिक्षण आणि विकास यामधील संबंधाचा विचार करता प्रामाणिक शिक्षण आवश्यक आहे. मात्र ते पुरेसे नाही. शिक्षणाचा विकासावरील प्रभाव अधिक व्यापक आणि जलद हे शिक्षण धोरणावर अवलंबून असते. 29 जुलै 2020 रोजी केंद्रिय मंत्री मंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मान्यता दिली आणि शासनाच्यावतीने सदर शैक्षणिक धोरणाचा आराखडा देशवासीयांसमोर मांडण्यात आला. या शिक्षण धोरणामध्ये विद्यार्थ्यांचे नेमके काय व्हिजन आहे हे लक्षात घेऊन त्या दिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल होय. म्हणूनच या शिक्षण धोरणाबरोबर भारत केंद्रित शिक्षण महत्वाचे धोरण या देशात आणले जाणार आहे. त्यामुळे हे शैक्षणिक धोरण भारताचे संपूर्ण व शाश्वत परिवर्तन करेल या देशात अत्यंत प्रगल्भ व सतत बदलांचा वेध घेणारा असा ज्ञानधिष्ठीत समाजनिर्मिती करणे हेच नव्या शिक्षणाचे ध्येय आहे. हे करत असतांना समज्ञायी दृष्टीकोन समोर ठेवला आहे. जेणेकरून सर्वांना याचा समान फायदा मिळेल आणि उत्कृष्ट गुणवत्तेचे ज्ञान समाजाच्या प्रत्येक घटकाला व प्रत्येक स्तरापर्यंत कसे पोहोचेल याचाही सखोल अभ्यास या शैक्षणिक धोरणामध्ये केला आहे. म्हणजेच गुणवत्तापूर्ण शिक्षण देशातील प्रत्येकाला देणे हे या नवीन शैक्षणिक धोरणाचे ध्येय आहे.

सतत बदलांचे बेध घेण्यासाठी व ज्ञानाधिष्ठित समाज बनवण्यासाठी आपल्याला संशोधनाची कास धरावी लागेल. हे लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणात संशोधनावर विशेष भर दिला आहे. गरजही शोधाची जननी आहे. म्हणून गरजा निश्चित करणे, त्या गरजा एका समाजाच्या नसून संपूर्ण देशातील नागरिकांच्या असतात. हे लक्षात घेऊन संशोधन निर्मिती करणे आवश्यक आहे. म्हणून यात नाविन्यतेचा विचार करावा लागेल. संशोधनात नाविन्यता आली. तर विविध प्रकारच्या सेवा, उत्पादने निर्माण होतील, त्यातून भारताची आर्थिक प्रगती होईल. नवीन विषयांची ज्ञाननिर्मिती होईल. सर्वांच्या सर्वांगीण विकासासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. संशोधनात भाषा, जात, धर्म इत्यादिंचा विचार न करता नाविन्यतेला प्राधान्य देऊन चालना देणे आवश्यक आहे. तरच संपत्तीची निर्मिती होईल. हे सारे एकदाच होणार नाही. यासाठी बराच कालावधी जावा लागेल. म्हणजेच हा बदल टप्पाटप्याने होणे अपेक्षित आहे. यासाठी नाविन्य व संशोधन याला समाजाने प्रचंड महत्व देणे अपेक्षित आहे. विविध विद्याशाखेतील ज्ञान असणे गरजेचे आहे. याचा उल्लेख नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात केला आहे.

**अध्यापन व मूल्यमापनाच्या नवीन पध्दती:**

राष्ट्रीय शिक्षण धोरणात अध्ययन व अध्यापनाच्या नवनवीन पध्दतीबाबतची स्पष्टता विद्यापीठ अनुदान आयोगाने विविध मार्गदर्शक सुचनांद्वारे केली आहे. केवळ वर्गामध्ये सर्व अभ्यासक्रम शिकवणे हे धोरणामध्ये अपेक्षित नाही. तर प्रात्यक्षिके, परिसंवाद,

सादरीकरण, इंटर्नशीप, कार्यशाळा, फिर्ल्डवर्क सामाजिक कामातील सहभाग व सेवा इत्यादी सर्व प्रकारे अध्ययन व अध्यापन व्हावे अशी रचना आहे. पाठयक्रमांची रचना करतांना सर्व प्रकारच्या अध्यापनाच्या प्रकाराचा उपयोग असणे आवश्यक आहे. 'केडिट' हे पाठयक्रम मोजण्याचे युनिट असेल. पाठयक्रमाचा कार्यभार केडीट तासांमध्ये मोजला जाईल. एक घडयाळी तासांच्या 15 लेक्चर्ससाठी केडीट देण्यात येईल, प्रात्याक्षिके, सामाजिक सहभाग व सेवा फिल्ड वर्क, परिसंवाद प्रोजेक्ट इत्यादी मधील 30 घडयाळी तासांना 1 केडिट देण्यात येईल. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रत्येक वर्षामध्ये विद्यार्थ्यांनी 40 केडिटचा आभ्यासक्रम पूर्ण करणे अपेक्षित आहे. विविध उपक्रम, प्रोजेक्ट, सादरीकरण सामाजिक सहभाग व सेवा इत्यादींना देखील मूल्यमापनामध्ये स्थान मिळणार आहे.

**पदवीचा कालावधीः**

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मुळ मसुद्यामध्ये पदवी ही 3 किंवा 4 वर्षाची असु शकेल. विद्यापीठ अनुदान आयोगाने डिसेंबमध्ये प्रकाशित केलेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या केडिट आराखडयामध्ये पदवीचा कालावधी हा 3 किंवा 4 वर्ष असेल असे स्पष्ट केले आहे. पदवी अभ्यासक्रमांचे तीन प्रकारामध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे.

1) तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम (एकूण : 120 केडिट)
2) चार वर्षाचा 'ऑनर्स' पदवी अभ्यासक्रम (एकूण 160 केडिट)
3) चार वर्षाचा संशोधनासह ऑनर्ससाठी पदवी अभ्यासक्रम (एकूण 160 केडिट)

पदवीच्या प्रत्येक वर्षानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल जसे की, पदवीच्या पहिल्या वर्षामध्ये विद्यार्थ्यांनी 40 केडिटचा पाठयक्रम व कौशल्य विकासाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र दिले जाईल. दुसऱ्या वर्षामध्ये 80 केडिटचा पाठकम व कौशल्य विकासाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास त्यांना पदविका दिली जाईल. पदवीच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर नोकरी वा अन्य कारणांमुळे शिक्षणामधून बाहेर पडलेले विद्यार्थी, तीन वर्षामध्ये पुन्हा पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेऊ शकतात व जास्तीत जास्त 7 वर्षामध्ये पदवी अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. तिसऱ्या वर्षानंतर विद्यार्थ्यांना पदवी घेऊन बाहेर जाता येईल. ही पदवी म्हणजे बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. अशी असेल. चौथ्या वर्षाच्या अभ्यासक्रमाचे 'ऑनर्स' व संशोधनासह ऑनर्स असे दोन प्रकार केले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना चौथ्या वर्षामध्ये संशोधनासह ऑनर्स पदवीला प्रवेश घ्यायचा असेल त्याला तीन वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमामध्ये एकूण 75 टक्के मिळविणे आवश्यक आहे. तसेच चौथ्या वर्षामध्ये 12 केडिटचा संशोधन प्रोजेक्ट पूर्ण करणे आवश्यक आहे.

**पदव्युत्तर शिक्षणः**

चार वर्ष कालावधीचा संशोधन पदवी अभ्यासक्रम किमान 75 टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पी.एच.डी.साठी पात्र होतील. संशोधन पदवी अभ्यासक्रमाचे चौथे वर्ष हे पदव्युत्तर पदवीच्या पहिल्या वर्षाशी समकक्ष असेल. याचाच अर्थ चार वर्षाच्या या पदवीनंतर पदव्युत्तर पदवीसाठी या विद्यार्थ्यांना केवळ एकच वर्ष पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घ्यावे लागेल. जे विद्यार्थी तीन वर्षाची पदवी घेऊन बाहेर पडले असतील अशा विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी शिक्षण घेण्यासाठी दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. पदव्युत्तर पदवीचे पहिले वर्ष पूर्ण केल्यानंतर जे विद्यार्थी बाहेर पडतील त्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदविका दिली जाईल. पदव्युत्तर पदवीचे दुसरे वर्ष पूर्ण केल्यावर त्यांना मास्टर्स पदवी दिली जाईल.

**ॲकॅडेमिक बॅक ऑफ केडिटः**

विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विविध उच्च शैक्षणिक संस्थांमधून शिक्षण घेता यावे याकरिता 'ॲकेडेमिक बॅक ऑफ केडिट' ची योजना करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थी पदवी अभ्यासक्रमातील काही पाठयकम हे अन्य उच्च शिक्षण संस्थामधून करू शकतील यासाठी विद्यार्थी व उच्च शिक्षण संस्थाना 'ॲकेडेमिक बॅक ऑफ केडिट' मध्ये नोंदणी करणे आवश्यक असेल. विद्यार्थ्यांना बहुशाखीय शिक्षण घेण्याच्या दृष्टीने ही संकल्पना अतिशय चांगली आहे. देशभरातील उच्च शैक्षणिक संस्थामधून आपल्या पसंतीनुसार ऑनलाईन तसेच ऑफ लाईन पाठयकम निवडण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त होईल. तसेच केवळ आपल्याच विद्याशाखेतील पाठयकम शिकण्याच्या बंधनातून देखील सुटका होईल. विद्यार्थ्यांना बहुशाखीय पाठयकम निवडण्याची मुभा विद्यार्थ्यांना असेल. विविध संस्थामधून जे पाठयकम विद्यार्थी मूल्यमापनासह पूर्ण करतील त्या विद्यार्थ्यांचे श्रेयांक संस्था त्या विद्यार्थ्यांच्या 'ॲकेडेमिक बॅक ऑफ केडिट' च्या खात्यामध्ये जमा करतील. विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र, पदविका, पदवी अभ्यासक्रमासाठी हे केडिट ग्राहय धरले जातील. उच्च शिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यातून कोणत्याही कारणाने बाहेर पडला तरी त्याला कोणत्याही उच्च शिक्षण संस्थेतून काही काळानंतर उच्च शिक्षण पुढे सुरू ठेवण्याचा पर्याय 'ॲकेडेमिक बॅक ऑफ केडिट'

मुळे उपलब्ध राहील. गतीशील, लचचिक, बहुशाखीय तसेच पसंतीनुसार शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी 'ॲकेडेमिक बॅक ऑफ क्रेडिट' ची माहिती करून घेणे उपयुक्त राहील.

**क्रिडा, एन.सी.सी., कला सामाजिक कार्यांना क्रेडिटः**

क्रिडा व विविध खेळ सादरीकरणाच्या कला, सामाजिक कार्य, एन.सी.सी. या सारख्या अन्य क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीला वा सादरीकरणला क्रेडिट देण्याची तरतूद आहे. हे श्रेयांक देतांना विद्यार्थ्यांने कोणत्या स्तरावर (जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय) सहभाग घेतला आहे. तसेच पदक जिंकले आहे किंवा विजेतेपद मिळाले आहे यावर श्रेयांक ठरविले जाणार आहे. केवळ अभ्यासक्रमातील गुणवत्तेलाच नव्हे तर विद्यार्थ्यांमधील इतर गुणवत्तेची दखल घेतली जाणार आहे.

**शिक्षण क्षेत्रापुढील आव्हानेः**

एकूण 135 कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात 15 ते 45 या वयोगटात 66 टक्के लोकसंख्या आहे. तरूणांना मानवी प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे शिक्षण आणि रोजगार सर्वत्र उपलब्ध करून देणे हे खरे आव्हान आहे. सध्या उपलब्ध असलेल्या एकूण रोजगारापैकी येत्या 10 वर्षाच्या कालावधीत बदलत्या तंत्रज्ञानामुळे 65 टक्के नोकऱ्या या अस्तित्वातच राहणार नाहीत असे भाकीत वर्तविण्यात येते. साधारणपणे 2035 वर्षापर्यंत आतापेक्षा दुपटीने आले भारतीय उच्चशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतील. सध्या 26 टक्के उच्च शिक्षण घेत असून 2035 पर्यंत 50 टक्के युवक उच्चशिक्षणात येणार असल्याने उच्चशिक्षण प्रदान करणाऱ्या संस्थांच्या संस्थेत देखील वाढ करावी लागेल. तंत्रज्ञान शिक्षण प्रदान करू शकत नाही , हे कोविडच्या काळात अनुभवास आले. ते एक साधन असून साध्य नाही. शेवटी शिकविणारे शिक्षक त्यांचे ज्ञान, त्यांची शिकविण्याची आवड आणि विद्यार्थ्यांप्रति तळमळ याच बाबी महत्वाच्या ठरतात. भारताचे उच्च शिक्षण प्रमाणबध्द करण्याकडे आपला कल असावा की दर्जेदार करण्याकडे हा खरा मुद्दा आहे. सहज ज्यामुळे शिक्षकांवर, पालकांवर ताण येणार नाही अशी शिक्षण पध्दत असावी, अशी अपेक्षा आहे. शैक्षणिक क्षेत्रापुढील ही सर्व आव्हाने लक्षात घेता आता केवळ सुधार न आणता परिवर्तन घडवून आणणे हीच काळाची गरज आहे. शिक्षणामुळे नोकरी प्राप्त होऊ शकते आणि शिक्षण जीवनाशी संबंधित आहे हा विश्वास जागृत करणे हे देखील आव्हान उभे टाकले आहे. साधारणपणे 34 वर्षांनंतर आलेल्या या नवीन शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीमुळे ही आव्हाने पैलू शकण्याची ताकद शैक्षणिक क्षेत्रात निर्माण होईल असा विश्वास निर्माण करण्यात आला आहे.

**सामाजिक शास्त्रे आणि भाषेची आव्हानेः**

व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास यांवर अधिक कक्ष केंद्रीत झाल्यास सामाजिक शास्त्रातील विषयाकडील असलेला विद्यार्थ्यांचा ओढा कमी होऊ शकेल. वैयक्तीक विकासासाठी मानव्य शास्त्रातील विषयांचे महत्व नवीन शैक्षणिक धोरणात नमूद केले आहे. परंतु बदलत्या परिस्थितीत पारंपरिक विज्ञान विषयांकडचा ओढा कमी झाला. तसेच सामाजिक शास्त्रातील विषयांच्या बाबतीत देखील घडले. बहुविद्याशाखीय व्यवस्था लागू झाल्यास तांत्रिक विषयांसोबत मानव्य विद्याशाखेतील पारंपारिक विषय जोडण्यात येतील. सध्या समाजिक शास्त्रातील विषयांमध्ये मराठी माध्यमांतून शि़क्षण घेणा—या विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते. परंतु त्यासोबतच मराठी भाषेतून होणारी ज्ञानाची निर्मिती इंग्रजीच्या तुलनेज बरीच कमी आहे. नव्या शैक्षणिक धोरणामध्ये स्थानिक आणि मातृभाषेला फार महत्व देण्यात आले आहे. परंतु प्रादेशिक भाषेतील लिखाण बऱ्याचदा वाङ्मयाच्या चौकटीतूनच तपासण्यात येते. सामाजिक शास्त्रातील लिखाण प्रादेषिक भाषेत सामोरे आणण्यासाठी संस्थात्मक रचनेची अत्यंत आवश्यकता आहे. राज्यातील विद्यापीठांमध्ये तसेच केंद्रिय विद्याठांमध्ये आपसात सहयोग प्रस्थापित होणे अत्यंत आवश्यक आहे. खाजगी विद्यापीठांचा देखील सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याने त्यांना अंमलबजावणीच्या प्रक्रियेत करून घेणे गरजेचे राहील.

**भविष्यकालीन धोरणः**

काही मोठया उच्चशिक्षण संस्था तशाच सुरू ठेवाव्यात आणि काही नवीन मोठया संस्था निर्माण कराव्यात. मात्र सर्व नकोत, शिक्षणावरील सरकारी खर्च स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या किमान 8—10 टक्के केला पाहिजे. कारण 6 टक्के हा आकडा 1966 मधील आहे. वित्तीय स्वायत्तेचा आग्रह सोडून शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वायत्तता घ्यावी. भारत ग्रामीण विभाग असलेला देश असल्याने तेथील महाविद्यालये व संस्था बंद न करता विना अनुदानित व अनुदाने घ्यावे. आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधनाचा सर्वव्यापी आग्रह न धरता निवडक करावे. त्यामुळे शिक्षण आणि विद्यार्थी प्रवाहातून बाहेर न पडता शिक्षक भरती करता येईल. पटसंख्या वाढविण्यासाठी बहिस्थ आणि दूरशिक्षणावर अधिक अवलंबून न राहता पुरक म्हणून वापरावे. शिष्यवृत्ती, वसतीगृहे

यांची आजची परिस्थिती खूप वाईट असून त्यांच्यात सुधारणा करावी. परकीय विद्यापीठे आणि संस्थांना देशात प्रवेश देतांना तो निवडक असावा. कारण ते शिक्षण खूप महागडे आहे.

**संदर्भः**


**[1].** राष्ट्रीय शिक्षण निती 2020 भारत सरकार.

**[2].** बौध्दीक संपदा हक्क – स्वरूप आणि समस्या प्रशांत प्रकाशन, जळगाव.

**[3].** लोकप्रभा जुलै – 2020

**[4].** महाराष्ट्र टाईम्स – 16 डिसेंबर 2022

**[5].** अर्थसंवाद – मराठी अर्थशास्त्र परिषद–जानेवारी–फेब्रुवारी–मार्च–2022

**[6].** दै.सामना 26 ऑगस्ट 2022

**[7].** Research Journey-International E-Research Journal April-2022.